वाचले-

१) पर्यावरण अभियांत्रिकी विभाग यांचेकडील पत्र क्र पअक/३/काबि/२७५/२०१८ दिनांक २१/०८/२०१८.

२) महाराष्ट्र राज्य शासन परिपत्रक क्र.न्यायाप्र २०१६ /प्र.र१२७ /नावि-१७ दिनांक १९/११/२०१६

३) उपविभागीय दंडाधिकारी हवेली उपविभाग पुणे-७ निलगिरी बंगला,राणीचा बाग अल्पबचत भवन मागे पुणे-०१.क्र फौज /कवि/११८०/२०१९ दिनांक २०/०८/२०१९

४) मा.क्षेत्रिय अधिकारी यांचा दिनांक २९/०८/२०१९ मान्य प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रिय कार्यालय,थेरगा
जा.क्र.गक्षेका/प्रशा/०६/कावि/336/२०१९
दिनांक २९/०८/२०१९

विषय- सन २०१९ मधील गणेशोस्तव /नवरोत्रौस्तव करीता मनपा रस्त्यावर उभारणेत येणा-या गणपती मंडळ मंडप / स्टेज/कमान तपासणी बाबत.

आदेश,

डॉ. महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र १७३/२०१० अन्वये मा.उच्च न्यायालयाने सार्वजनिक उत्सव साजरे करताना रहदारीस अडथळा होणार नाही त्या अनुषंगाने विस्तृत निकालाच्या आदेशास अधिन राहून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये मनपा क्षेत्रामध्ये सार्वजनिक सण /उत्सव/समारंभासाठी मनपाच्या रस्त्यावर / पदपथावर उभारण्यात येणा-या गणपती मंडप / स्टेज / कमान इत्यादी तपासणीसाठी तपासणीपथक गठीत करणेबाबत वाचले क्र २ अन्वये कळविणेत आले आहे.

वाचले क्र ०१ ते०४ नुसार मी क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय या आदेशान्वये ग क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत येणा-या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र २१,२३,२४ व २७ मधीस सन २०१९मधील ग क्षेत्रिय कार्यालयातंर्गत गणपती मंडळ मंडप तपासणी / नवरात्रौत्सव करिता मनपा रस्त्यावर /पदपथावर उभारणेत येणा-या गणपती मुर्ति विक्री साठी / मंडप/ स्टेज / कमान तपासणीकामी प्रभाग निहाय खालील तक्तात नमुद केले नुसार उपअभियंता तसेच कनिष्ठ अभियंता यांची सदर तपासणी कामकाजासाठी नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र | पथक प्रमुख नाव | पदनाम व विभाग | प्रभाग क्र | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.विनय भाऊसाहेब ओहोळ | उपअभियंता स्थापत्य<br>ग क्षेत्रिय कार्यालय (पथकप्रमुख) | २१,२३,२४,२७ | ९९२२५०१७५३ |
| ०२ | श्री. मोमीन ए. ए. | कनिष्ठ अभियंता | २७ | ९९२२५०११२७ |
| ०३ | श्री. इम्रान कलाल कयूम | कनिष्ठ अभियंता | २१, २७ | ७७२२०६०९२० |
| ०४ | श्री. जोशी अतुल सहादू | कनिष्ठ अभियंता | २४ | ८३८००५९४३४ |
| ०५ | श्री. कोरेवार श्री. बा. | कनिष्ठ अभियंता | २३ | ९०७५००७५२६ |

उपरोक्त उपअभियंता यांनी नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्रातील सन २०१९ मधील सार्वजनिक गणपती उत्सवापुर्वी मनपा जागेवरील गणपती मंडळ मंडप तपासणी करून अहवाल दि. ३०/०८/२०१९ ते दि १२/०९/२०१९ कालावधीतील ग क्षेत्रिय कार्यालयाच्या अतंर्गत संबंधीत ठिकाणी नियमितपणे भेटी देउन आणि क्षेत्रिय अधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय तात्पुरत्या स्वरूपात गणपती मंडळ मडंप / स्टेज / कमानी व तत्सम रचना उभारणेत येत असल्याचे आढळुन आल्यास उत्सवापुर्वी बेकायदेशीर / अनाधिकृत आढळुन येणारे मंडप व तत्सम रचना आपले नियंणाखाली धार्मिक कार्यक्रमापुर्वी नियमानुसार (नोटीस इत्यादीसह) निष्कासीत करण्याची कारवाई करावी. विषयांकित तपासणी कामकाज करताना मंडप व तत्सम परवानगी पत्राची / आदेशाची पत्र दर्शनी भागात प्रदर्शित करावयास संबंधित मंडळांना सूचना द्याव्यात .

वरीलप्रमाणे नियमाधीन करवाई/ कार्यवाही अंमलबजावणी करताना कोणत्याही प्रकारचा अडथळा/बाधा निर्माण झाल्यास संबंधित स्थानिक पोलिसांची मदत घेण्यात यावी. त्याचप्रमाणे परवानगी

Scanned by CamScanner

पत्र/आदेशातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग होत नाही याचीही वेळोवेळी पाहणी/ तपासणी करावी आणि वेळोवेळी नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारीची खातरजमा करून निवारण करावे.

उपरोक्त प्रमाणे केलेल्या कारवाई/ कार्यवाही अहवाल सोबतच्या नमुन्यात दररोज क्षेत्रिय कार्यालयातील भूमि जिंदगी टेबल क्र. ६ कडे देण्यात यावा. उपरोक्त कामकाज उपअभियंता यांनी त्यांचे स्वतःचे कार्यालयीन कामकाज सांभाळून करावयाचे आहे. तसेच उपअभियंता यांना विषयांकित कामकाजासाठी सहाय्यक म्हणून आपले नियंत्रणाखालील प्रभागतील कनिष्ठ अभियंता स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व इतर कर्मचारी वर्ग याची नेमणूक आपणकडून करण्यात यावी, सदर पथकचे प्रमुख हे उपअभियंताच राहतील. सदरचे संपूर्ण तपासणी पथकाच्या कामकाजावर क्षेत्रिय अधिकारी 'ग' क्षेत्रिय कार्यालय यांचे नियंत्रण राहील .

श्रीम.स्मिता झगडे
सहा.आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी
ग क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव पुणे-३३

प्रति,

१) श्री. विनय भाऊसाहेब ओहोळ, उपअभियंता स्थापत्य ग क्षेत्रिय कार्यालय

प्रत

२) कार्यकारी अभियंता स्थापत्य ग क्षेत्रिय कार्यालय थेरगाव

३) सहा. आयुक्त भूमि जिंदगी विभाग पिंपरी १८

४) कार्यकारी अभियंता पर्यावरण अभियांत्रिकी विभाग पिंपरी १८

५) बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन विभाग पिंपरी १८

६) उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे

७) अप्पर तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पिंपरी चिंचवड

Scanned by CamScanner